Annex "A"

वन विभागाच्या योजनांतर्गत/योजनेतर योजनावर सलग पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून कार्यरत असलेल्या मजूरांना नियमित आस्थापनेवर आणण्यासाठी मजूरांची अधिसंख्य पदे निर्माण करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एलएबी-71094/प्र.क्र.252/फ-6,
मंत्रालय, मुंबई -400032
दिनांक 31 जानेवारी 1996

वाचा :- 1. मुख्य वनसंरक्षक, (संधारण ) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र.10 (6) आस्था/व.म./59/94-95/207 सन 199‌‌ -96 दिनांक 6.10.1996

2. शासन निर्णय महसूल व वनविभाग,क्रमांक एसयचुपी-10 330/प्र.क्र.486/द-1, दिनांक 28 डिसेंबर 1995.

वन विभागातील विविध योजनांतर्गत / योजनेतर योजनावर किमान वेतन अधिनियमानुसार किमान वेतन दराने रोजंदारी मजूर वन कामासाठी लावण्यात आलेले असून ते सातत्याने नैमित्तिक रोजंदारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या रोजंदारी मजूरीचा प्रदीर्घ कालावधी विचारात घेऊन त्यांनी गट "ड" मधील समय वेतन श्रेणीत नियमित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

निर्णय :-

वन विभागामध्ये योजनांतर्गत/योजनेतर योजनेमध्ये सलग कार्यरत असलेल्या ज्या रोजंदारी मजूरांनी दिनांक 1.11.1994 रोजी 5 वर्षाची सलग सेवा पूर्ण केलेली आहे. अशा संदर्भ क्र.1 मधील 10160 अधिसंख्य पदापैकी 8038 (परिशिष्टात नमूद केलेल्या ) दिनांक 1.11.1994 पासून नियमित करण्यात येत असून त्यांना गट "ड" मध्ये वन मजूर म्हणून समाविष्ट करण्यात आल्यामुळे त्यांच्यासाठी 8038 अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. ही पदे खालील अटीत अधीन राहून निर्माण करण्यांत आलेली आहेत.

1. पाच वर्षाच्या सलग सेवेचा कालावधीची गणना करतांना वन विभागातील योजनांतर्गत / योजनेतर योजनेवर रोजंदारी मजूरांनी प्रत्येक वर्षात कमीत कमी 247 दिवस काम केलेले असावे. या करिता पाच वर्षाचा कालावधी मोजतांना रोजगार हमी योजना किंवा रोजगार हमी देणा-या तत्सम योजनेवर केलेल्या कामांचे दिवस विचारात घेण्यात येऊ नयेत.

2. ही गट "ड" आधासख्या पदे मजूर संवर्गात समय वेतनश्रेणी रुपये 650-12-870 - द.रो.-14-940 मध्ये निमार्ण करण्यात येत आहेत.

3. सदर पदे "ड" गटात निर्माण करण्यांत येत असल्यामुळे या मजूरांना "वन मजूर" संबोधण्यात यावे.

4. निर्माण करण्यांत येणारी पदे संबंधित मजूर सेवेत असे पर्यंत चालू राहतील व कोणत्याही कारणाने मजूर सेवेतून कमी झाल्यास ते पद आपोआपच रदद होईल त्यांच्या रिक्त पदावर दुस-या मजूरांची नेमणुक करण्यांत येवू नये.

5. ज्यांची वन विभागातील सलग सेवा पाच वर्षापेखा जास्त झालेली आहे त्यांचा वन विभागातून गट "क" व "ड" मधील रिक्त पदे असतांना नेमणुकीसाठी खालीलप्रमाणे विचार करण्यात यावा.

अ) गट "क" किंवा गट "ड" साठी नेमणूक करतांना फक्त वयोमर्यादे संबंधीत अट खालील प्रमाणे शिथील करण्यात यावी.

1. वयाच्या 30 वर्षानंतर (संबंधित मजूर) जेवढी वर्षे वन विभागात कार्यरत आहेत तेवढया वर्षानी वयाची अट शिथील करण्यात यावी. उदाहरणार्थ ज्यांनी 5 वर्षे सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या 35 वर्षे पर्यंत व ज्यांनी 12 वर्षे सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या 42 वर्षे पर्यंत वयाची अट शिथील करण्यात यावी.

ब) सेवा योजन कार्यालया मार्फत ज्या पदावर भरती करण्यात येते त्याच पदावर भरती करण्यात यावी. त्या पदावर भरती करण्यातस सेवायोजन कार्यालयाची अट शिथील करण्यांत येत आहे.

क) निवड मंडळातर्फे करण्यात येणारी पदे निवड मंडळामार्फतच करण्यात यावीत. परंतू वरीलपैकी जे उमेदवार निवडमंडळाकडे अर्ज करतील त्यांना वरील अ (1) प्रमाणे वयाची अट शिथील करण्यांत यावी.

6) सध्या रिक्त असलेली "क" व "ड" ही पदे भरतांना आरक्षणाबाबत शासनाचे प्रचलीत आदेश लागू राहतील.

7) यापुढे वन विभागातील हगांमी कामासाठी रोजंदारी मजूरांची आवश्यकता भासल्यास हंगामी कामाशिवाय इतर कोणत्याही बारमाही कामास मजूर घेण्यात येवू नयेत. हंगामी कामासाठी

एखादयाचा मजूरांच्या सेवा कुठल्याही परिस्थितीत 3 तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी चालू ठेवण्यात येऊ नयेत.

8) या वन मजूरांना सध्याचे वन मजूरीमध्ये समाविष्ट असलेले कोणतेही काम तसेच आवश्यकतेनुसार व विभागात उपलब्ध असलेली गट "ड" ची समक्ष कामे घेण्यात यावीत.

9) दिनांक 1.11.1994 रोजी 5 वर्षे पूर्ण न परंतू रोजंदारी मजूर म्हणून कार्यरत असलेल्या मजूराच्या आवश्यकतेबाबत आढावा घेण्यात यावा व त्यांनी आवश्यकता नसल्यास त्यांना विहीत पध्दतीने कामावरुन कमी करण्यात यावे.

10) सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील मजूराबाबतचे आदेश प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी संबधित उपवनसंरक्षकांना 10 दिवसाच्या आत संबंधित प्रत्येक मजूराला कळविण्याचे आदेश द्यावेत.

11) सदर मजूरांच्या आस्थापनावरील खर्चासाठी प्रत्येक वर्षात आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात यावी.

12) सध्या निर्माण करण्यात येत असलेल्या पदा व्यतिरिक्त परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेल्या उर्वरित मजूरांची अधिसंख्य पदे निर्माण करण्यासंबधी प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी तपासणी करुन प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यांबधीचे आदेश यथाकथित निर्गमि करण्यांत येतील.

13) सदर पदांचा दि.1.11.1994 ते 29.2.1996 पर्यंतचा खर्च मागणी क्रमांक सी-17 2406 वनीकरण व वन्यजीवन, 101 वनसंधारण व विकास 101 यारा वन मजूराच्या अनुदानातून भागविण्यात यावा.

14) सदर शासन निर्णय, सामानय प्रशासन विभाग, उद्योग व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, उद्योग, उर्जा व कामागार विभाग व विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सिआर 75-96 व्य-10 दिनांक 30.1.96 अन्वये त्याच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/-
(उ.मु.टेंभरे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वनविभाग

सोबत - परिशिष्ट 1 ते 17